Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३९ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२७ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रातील १४ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण

## गरिबीतून मुक्ती हाच खरा सामाजिक न्याय – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी







**शिर्डी । प्रतिनिधी**

गरिबीतून मुक्ती मिळणे आणि गरिबातील गरीब कुटुंबाला पुढे जाण्याची संधी मिळणे हाच खरा सामाजिक न्याय आहे. केंद्र शासनाची सर्वोच्च प्राथमिकता ही गरीब कल्याणआहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. महाराष्ट्रातील २६ जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन कटीबध्दअसल्याची ग्वाहीदेखील प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

शिर्डी विमानतळाजवळ असलेल्या काकडी येथील मैदानावर आयोजित शेतकरी मेळाव्यात आज प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते संगणकीय कळ दाबून महाराष्ट्रातील १४ हजार कोटी रूपयांहून अधिक विकास प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, महसूल मंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, कामगार मंत्री सुरेश खाडे, खासदार सदाशिवराव लोखंडे, खासदार डॉ.सुजय विखे पाटील, खासदार उन्मेष पाटील, आमदार राम शिंदे, आ.बबनराव पाचपुते, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर उपस्थित होते.पाच वर्षांपूर्वी शिर्डीत आलो होतो तेव्हा साई शताब्दी वर्ष होते. तेव्हा मला साई दर्शनाची संधी मिळाली होती. असे वाक्य मराठीतून बोलून आपल्या भाषणाला प्रधानमंत्र्यांनी सुरूवात केली.प्रधानमंत्री श्री. मोदी यावेळी म्हणाले की, महाराष्ट्राला पन्नास वर्षांपासून प्रतिक्षा असलेल्या निळवंडे धरणाचे आज जलपूजन करून लोकार्पण झाले. यामुळे या भागातील शेती पाण्याखाली येणार आहे. पाण्याचा एक एक थेंब अमूल्य आहे. तेव्हा पाण्याचा जपून वापर झाला पाहिजे, अशी अपेक्षाही प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.श्री साईबाबा मंदीर दर्शनरांगेचे आज लोकार्पण झाले.दर्शन रांग प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे देश विदेशातील भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. असे त्यांनी यावेळी सांगितले.वारकरी संप्रदायाचेवैभव बाबा महाराज सातारकर यांचे आज दुखद निधन झाले. त्यांनी कीर्तन-प्रवचनातून माध्यमातून समाज जागृतीचेकाम केले, अशा शब्दात त्यांनी यावेळी बाबा महाराजांना श्रध्दांजली अर्पण केली.महाराष्ट्रात १ कोटी १० लाख आयुष्मान भारत कार्ड देण्यात येणार आहेत. या सर्वांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. या योजनेवर ७० हजार कोटी रुपये खर्च केले आहेत.गरिबांना मोफत शिधावाटप योजनेवरही ४ लाख कोटी रुपये खर्च केले आहेत. गरिबांच्या मोफत आवास योजनांसाठी ४ लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हर घर जल पोहोचविण्यासाठी आतापर्यंत २ लाख कोटी खर्च करण्यात आले आहेत.पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत देखील पथारी व्यवसायातील लाभार्थ्यांना हजारो रुपयांची मदत मिळत आहे.आता प्रधानमंत्रीविश्वकर्मा योजना सुरू केली आहे. यातून सुतार, सोनार, कुंभार, मूर्तिकार असे लाखो कारागिरांना प्रथमच शासनाकडून मदत मिळणार आहे. या योजनेवरही १३ हजार कोटी खर्च करण्यात येणार आहेत,असे श्री. मोदी यांनी सांगितले.केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी छोट्या शेतकऱ्यांसाठी सुरू केली असून या योजनेतून २ लाख ६० हजार कोटी रुपये दिले आहेत. या योजनेत महाराष्ट्रातील छोट्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २६ हजार कोटी थेट पध्दतीनेवर्ग केले आहेत. १९७० मध्ये घोषणा झालेल्या निळवंडे धरण प्रकल्प मागील पाच दशकापासून रखडला होता.शासनाने या प्रकल्पाला गती दिली.राज्यातील अवर्षणप्रवण भागासाठी सुरू केलेली बळीराजा जल संजीवनी योजना प्रभावी ठरणार आहे. असे ही ते म्हणाले.शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत अंतर्गत गेल्या सात वर्षात साडेतेरा लाख कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.एमएसपीचा पैसा थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पाठवण्याची व्यवस्था केली आहे. नुकतीच रब्बी पिकांसाठी एमएसपीची घोषणा केली असून त्यात चना, गव्हाच्या एमएसपी मध्ये वाढ करण्यात आली आहे. ऊसाचे मूल्य ३१५ रुपये प्रति क्विंटल करण्यात आले आहे. गेल्या ९ वर्षात ७० लाख कोटी रुपयांचे इथेनॉल खरेदी केले आहे. शेतकऱ्यांना ऊसाचे पैसे मिळावेत म्हणून साखर कारखान्यांना लाखो कोटींची मदत शासनाने केली आहे. अशी माहिती त्यांनी दिली.सहकारी चळवळीला बळकट करण्याचे काम केंद्र शासनाने केले आहे. देशभरात २ लाख पेक्षा अधिक सहकारी संस्था स्थापन केल्या जात आहेत. सहकारी संस्थामार्फत कोल्ड स्टोरेज उभारण्यात येत आहेत. छोट्या शेतकऱ्यांना शेतकरी उत्पादक संघांच्या माध्यमातून संघटित केले असून जितका महाराष्ट्राचा विकास होईल तितकाच वेगाने देशाचा विकास होईल.असे ते म्हणाले.महाराष्ट्रात रेल्वेच्या विस्ताराबरोबर रस्ते विकासाचे काम सतत चालू आहे. ही दळणवळण साधने प्रगती आणि सामाजिक विकासाच्या नवे मार्ग बनतील, असेही प्रधानमंत्र्यांनी सांगितले.२०४७ साली देश स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करत असताना जगात भारताचे नाव विकसित भारताच्या रुपात असेल हा संकल्प करूया, असेही श्री .मोदी म्हणाले राज्यात केंद्राच्या सहकार्यातून २ लाख कोटींची विकासकामे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले,केंद्र शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्रात २ लाख कोटी रूपयांच्या कामाचे भूमिपूजन व लोकार्पण आतापर्यंत झाले आहे. देशाचा सर्वंकष विकासाचा ध्यास घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुढे जात आहेत. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, देशाला महासत्ता बनवण्यासाठी श्री मोदी अविरतपणे कार्य करत आहेत तोच आदर्श घेऊन आपले सरकार सुद्धा गोरगरिबांच्या विकासासाठी काम करत आहे. राज्यात नवीन विकास योजना आणण्याचे महत्त्वपूर्ण काम श्री मोदी यांनी केले आहे.राज्यात ७०० ठिकाणी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू केला असून गोरगरिबांना यामाध्यमातून विनामूल्य उपचार उपलब्ध करून दिला जात आहे. नागरिकांना पाच लाखापर्यंत विविध आरोग्य विषयक सुविधांचा कॅशलेस स्वरूपात लाभ दिला जात आहे,असेही त्यांनी सांगितले.शिर्डी साईबाबा मंदीर दर्शनरांगेचा फायदा असंख्य भाविकांना होणार आहे. असे त्यांनी सांगितले.पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाडा व विदर्भाला देण्याचा आराखडा तयार- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी २०१७ मध्ये शिर्डी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन केलेल्या कामांचे उद्घाटन आज त्यांच्याच हस्ते होत आहे. जगभरातून साईभक्त येथे येतात त्यांच्याकरिता अनेक सुविधा देण्यात येत आहेत. अनेक वर्षापासून वाट पाहायला लागलेल्या निळवंडे प्रकल्पाला २०१६ - १७ मध्ये आम्ही गती दिली.गेल्या ९ वर्षात प्रधानमंत्र्यांनीमहाराष्ट्रातील सिंचन योजनांसाठी ३० हजार कोटी रूपये दिल्यामुळे राज्यात अनेक सिंचन योजना राबविता आल्या.पीएम किसानच्या धरतीवर आम्ही नमो किसान सन्मान निधी योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राचा ५० टक्के भाग अवर्षणग्रस्त आहे. या भागाला पाणी दिल्याशिवाय महाराष्ट्रातील आत्महत्याची संख्या कमी होणार नाही. पश्चिमवाहिनी नद्यांचे समुद्राला मिळणारे पाणी गोदावरी नदीपात्रात वळते करून मराठवाडा सुजलाम सुफलाम करू शकतो. या योजनेचा आराखडा तयार केला आहे. तसेच वैनगंगा नदीच्या खालील भागातून वाहून जाणारे १०० टीएमसी पाण्यापैकी ६७ टीएमसी पाणी नळगंगा मध्ये आणू शकतो. ज्यातून विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करू शकतो. यासाठी केंद्र सरकारने या प्रकल्पांनाही मदत करावी. अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांकडे व्यक्त केली.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, देशाच्या ५३ वर्षाच्या इतिहासात निळवंडे धरण प्रकल्पास गती मिळाली नव्हती. आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून केंद्र शासनाने या प्रकल्पास निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे स्वप्न साकार झाले आहे. महाराष्ट्र ही भक्ती - शक्तीची भूमी आहे. प्रधानमंत्री यांच्या भेटीतून लोककल्याणासाठी काम करण्याची उर्जा मिळणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणजे विकास हे समीकरण घट्ट झाले आहे. आज अनेक प्रकल्पांचे लोकार्पण होत आहे. निळवंडे धरण होत असतांनाच योग्य प्रकारचीपीके घेण्यात यावे. शून्य टक्के व्याजाने पीक कर्ज व एक रूपयात पीक विमा असे अनेक कल्याणकारी निर्णय शासनाने घेतले आहेत. असे उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी सांगितले.महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे यावेळी स्वागतपर भाषण झाले. निळवंडे धरण प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील दुष्काळग्रस्तांना दिलासा मिळणार आहे. अहमदनगर जिल्हा केंद्र व राज्य शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीत आघाडीवर असल्याचा उल्लेख त्यांनी केला.यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी संपत नाना राक्षे, खरैनूसा बशीर शेख, सविता गणेश राजभोज यांना आयुष्यमान कार्ड तसेच स्वामीत्व योजनेचे लाभार्थी दगडू भागवत गिते, शहाजी शंकर लोके यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लाभ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमापूर्वी, मेरी माटी मेरा देश अभियानात अहमदनगर जिल्ह्यातून संकलित करण्यात आलेल्या मातीचा कलश प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मराठीचा अभ्यासक्रम या विषयावर विद्यापीठस्तरीय चर्चासत्र २८ ला

**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली-मराठी प्राध्यापक परिषद व तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी तसेच धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय विद्यापीठस्तरीय चर्चासत्र 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मराठीचा अभ्यासक्रम' या विषयावर शनिवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आले आहे. धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर येथील मातोश्री विमलाताई देशमुख सभागृहात संपन्न होणाऱ्या या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ . गणेश मोहोड (अध्यक्ष मराठी प्राध्यापक परिषद) उद्घाटक म्हणून डॉ. संजय कवीश्वर (अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन शाखा, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ) हे राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. ओमप्रकाश देशमुख (धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर) व प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे (तायवाडे कॉलेज, महादुला- कोराडी) राहतील. प्रास्ताविक व परिचय परिषदेचे सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे करून देतील. याप्रसंगी डॉ. मनिषा नागपुरे सूत्रसंचालन व आभार डॉ. भारती खापेकर व्यक्त करतील.

'पदवी पातळीवरील मराठीचा अभ्यासक्रम ' हा परिसंवाद डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी डॉ. संजय लाटेलवार, डॉ. अजय कुलकर्णी, डॉ. देवयानी चव्हाण विषयानुरूप कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील मराठीच्या अभ्याक्रमासंदर्भात माहिती देणार आहे. यावेळी सूत्रसंचालन डॉ. पद्मिनी घोसेकर व आभारप्रदर्शन डॉ. संगीता खुर्द करतील.चर्चासत्रातील दुसरे सत्र ' पदव्युत्तर पातळीवरील मराठीचा अभ्यासक्रम ' या विषयावर होणार असून यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. शैलेंद्र लेंडे (प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख रा.तु.म.नागपूर विद्यापीठ) हे राहतील. यावेळी डॉ. राजेंद्र नाईकवाडे व डॉ. संजय लाटेलवार हे अभ्यासक्रमाचा आराखडा सादर करतील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम सर्वच मराठीच्या प्राध्यापकांना जाणून घेणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने दोन्ही विद्यापीठातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी आवर्जुन उपस्थित राहावे असे आवाहन मराठी प्राध्यापक परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. हिराजी बनपूरकर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, समन्वयक डॉ. भारती खापेकर आणि डॉ. कोमल ठाकरे यांनी कळविले आहे .

# तुळजाभवानीला ९ दिवसांत १२ किलो चांदी, पाऊण किलो सोने:१ कोटी ९३ लाख रुपये सशुल्क दर्शनातून प्राप्त

**तुळजापूर**-नवरात्रीमध्ये भवानीमातेच्या उत्पन्नात पावणेचार कोटी रुपयांची भर नवरात्रीच्या नऊ दिवसांत भाविकांनी तुळजाभवानीचरणी पाऊण किलो सोने तर १२ किलो चांदी अर्पण केली आहे. याशिवाय तुळजाभवानीच्या उत्पन्नात या कालावधीत पावणेचार कोटी रुपयांची भर पडली आहे. यामध्ये सर्वाधिक १ कोटी ९३ लाख रुपये सशुल्क दर्शनातून मिळाले आहेत.मंदिर संस्थानचे अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी योगेश खरमाटे, व्यवस्थापक तहसीलदार सोमनाथ माळी, लेखाधिकारी सिद्धेश्वर शिंदे, धार्मिक व्यवस्थापक सिद्धेश्वर इंतुले आदींनी दर्शन व्यवस्थेचे उत्तम नियोजन केले होते. भाविकांना सुलभ दर्शनाचा लाभ झाला. घटस्थापना ते विजयादशमी नवरात्रीच्या ९ दिवसांत दररोज लाखावर भाविकांनी तीर्थक्षेत्र तुळजापुरात हजेरी लावली असून या कालावधीत भाविकांनी तुळजाभवानी च्या दानपेटीत भरभरून दान टाकले आहे. यामध्ये रोख रकमेसह मोठ्या प्रमाणावर सोन्या-चांदीचा समावेश आहे.नवरात्र महोत्सवात मंदिर संस्थानने सशुल्क दर्शन शुल्कात वाढ करत १०० ऐवजी ३०० रुपये केले होते. याशिवाय ५०० रुपयांचे व्हीआयपी दर्शन सुरूच होते. नवरात्रीच्या नऊ दिवसांत ३ लाख ७३ हजार २४७ भाविकांनी सशुल्क दर्शनाचा लाभ घेतला असून या माध्यमातून सर्वाधिक १ कोटी ९३ लाख ६६ हजार ४६२ रुपये उत्पन्न मिळाले असल्याचे सांगण्यात आले.

# रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता उपजिल्हा रुग्णालय मूल येथील रिक्त पदे तात्काळ भरा-मंगेश पोटवार

**मूल । प्रतिनिधी**

उपजिल्हा रुग्णालय मूल येथे एकूण ४८ पदे मंजूर असून त्यात वैद्यकीय अधीक्षकासह अजून १३ पदे रिक्त आहेत. दिवसेंदिवस मूल तालुक्यातील रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे आणि रुग्णालयात आवश्यक स्टॉप उपलब्ध नसल्यामुळे आहेत त्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडून रुग्णांना योग्य उपचार घेताना अडचणी निर्माण होत आहेत. उपजिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसांमध्ये आवश्यक त्यावेळेस रुग्णावर उपचार न झाल्यामुळे रुग्णांना जीव गमावण्याची वेळ आली. असा आरोप रुग्णाच्या नातेवाईकानी केला होता. रोज जवळपास सहाशे ते सातशे रुग्ण उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय येथे येत असून त्यात वृद्ध महिला पुरुष छोटे बालक यांचा समावेश आहे. रुग्णांची मोठी संख्या असल्यामुळे जवळपास रुग्णांना दोन ते तीन तास तब्येत बरी नसताना सुद्धा लाईन मध्ये ताटकळत उभे राहावे लागत आहे.या सर्व समस्यांचे निराकरण व्हावे आणि तालुक्यातील



रुग्णांना योग्य उपचार मिळावा या हेतूने चंद्रपूरचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर चिचोणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिष्टमंडळाने मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांच्या नेतृत्वाखाली भेट घेत उपजिल्हा रुग्णालय मूल येथील वैद्यकीय अधीक्षकासह रिक्त पदे तात्काळ भरावे आणि रुग्णांना होणारी गैरसोय टाळावी अशी विनंती यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिष्टमंडळाने केली.यावेळेस शिष्टमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मूल शहराध्यक्ष आकाश येसनकर याचे सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.विपीन ईटनकर यांची 'संकल्प' ला भेट

## लाखो अनुयायांनी घेतला संकल्पच्या निशुल्क भोजनाचा लाभ

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनात पवित्र दीक्षाभूमी येथे 'संकल्प' सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारताच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लाखो अनुयायांकरिता निशुल्क भोजन वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. २३ ते २५ ऑक्टोबर पर्यंत अविरत तीन दिवस अनुयायांना भोजनाचे वितरण करण्यात आले. 'संकल्प' च्या भोजनदानाची सोमवारला माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते सुरुवात झाली. विषमतेच्या मुळांना उखडून फेकून माणुसकीची नवी फुलबाग फुलवणारा क्षण म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन दिन होय. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऐतिहासिक अशा रक्तविहीन धम्मक्रांतीचा जयघोष केला आणि अंधारात चाचपडणाऱ्या लाखो अस्पृश्यांना बुद्धाचा तेजस्वी प्रकाश दाखविला.संपूर्ण देशातून दीक्षाभूमीवर आलेल्या अनुयायांना भोजनदानाने 'संकल्प' च्या उपक्रमाची दरवर्षी प्रमाणे सुरुवात झाली होती. 'संकल्प' ही नोंदणीकृत सामाजिक संस्था मागील ३७ वर्षापासून दलित, शोषित, मागासवर्गीय समाजाच्या




उत्थानासाठी अनेक विभिन्न कार्यक्रम सतत राबवित आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, आर्थिक समतेचे व आमुलाग्र परिवर्तनाचे स्वप्न साकार करण्यासाठी ही संघटना सातत्याने झटत आहे. तसेच १९८७ पासून 'संकल्प' संस्थेव्दारे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमास देशाच्या विविध प्रांतातुन तसेच महाराष्ट्राच्या वेगवेगळया जिल्ह्यतून तसेच गाव खेड्यातून येणाऱ्या लाखो भाविकांना दरवर्षी सतत ३ दिवस उत्तम भोजन उपलब्ध करुन देण्यात येत असते. सोबतच संकल्पच्या कार्यालयात मदत केंद्र, स्वच्छ स्वयंपाकघर क्षेत्र, भोजन वितरण कक्ष आणि अनुयायांच्या निवासाकरिता निवासी केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती.धम्मचक्र प्रवर्तन दिनी नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिक्षाभूमी परिसरातील संकल्पच्या स्टॉल ला भेट देऊन भोजन वितरणाची व संस्थे मार्फत चालविल्या जाणाऱ्या इतर उपक्रमा संबधी माहिती घेतली. यावेळी त्यांनी संस्थे मार्फत वितरित होणाऱ्या भोजनाचा आस्वाद देखील घेतला. लाखोच्या संख्येने अनुयायी भोजनाचा आस्वाद संकल्पच्या माध्यमातून घेत असतात.कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता संकल्प सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सर्वश्री अशोक हुमणे, राजा करवाडे, अनिल नगरारे, शशी रायपुरे, विनय सहारे, विनोद शेंडे, किशोर टेंभुरकर ई. यांनी रात्र दिवस कठोर परिश्रम घेतले.

# स्वरानंदवनचे किमयागार : डॉ. विकास बाबा आमटे

**कुरूपतेला सूर,लय आणि ताल यांच्या माध्यमातून सौंदर्य देणारे किमयागार व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. विकास बाबा आमटे. बाबा आमटे नावाच्या विशाल वटवृक्षासोबत वाटचाल करीत स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करणे हे सोपे काम नव्हते. प्रामाणिकता आणि अपार कष्ट यातून त्यांनी रचनात्मक काम करत नवनवीन संकल्पना अमलात आणल्या .आनंदवनला समृद्ध बनविले. डॉ.विकास आमटे हे प्रयोगशील, बुद्धिमान कार्यकर्तेच नाहीत तर प्रतिभावंत कलाकारही आहेत. आनंदवनातील स्वरानंदवन ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून त्यांच्यातील सुप्त कलागुणांचा परिचय होतो. सर्वसामान्यांच्या सुखदु:खात सहभागी होत आनंद वाटणारे अफलातून व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. विकास आमटे होय.**










ज्यांनी हाताची बोटे पाहिलेली नाही. ज्यांनी आपल्या वाणीतून शब्द उच्चारला नाही. ज्यांनी आपल्या डोळ्यांनी जग पाहिले नाही. ज्यांना आपल्या पायावर उभे राहता येत नाही. परंतु धडधाकट असणाऱ्यांना लाजवेल अशा पद्धतीची निर्मिती ते करू शकतात. ज्यांच्याकडे वाणी नाही ते वाणी असणाऱ्यांपेक्षाही चांगली अदाकारी करू शकतात. डोळे नसताना डोळस माणसांपेक्षा जास्त डोळसपणे वागतात. आणि पाय नसतानाही आपण उभे राहू शकतो हे जगापुढे दाखवून देतात. अशा अभागी व्यक्तिमत्त्वांना पैलू पाडल्याचे काम डॉ. विकास आमटे करताहेत. हा स्वरांचा सोहळा वाचून समजण्यासारखा नाही तर तो प्रत्यक्ष याची देही याची डोळा अनुभवावा लागतो. वेदनेचा हुंकार आणि सप्त स्वरांचा झंकार यांचा मिलाप अनुभवणे स्वर्गीय अनुभूती वाटते. या कार्यक्रमांत दिव्यांग कलाकार संगीताच्या तालावर अशा सुरेख पद्धतीने कला प्रदर्शित करतात की, बघणाऱ्यांना त्यांच्या दिव्यांगत्वाबाबत शंका यावी इतके नयनमनोहर सादरीकरण करण्यात स्वरानंदवन सफल झाले आहे.ज्यांना समाजाने दुर्लक्षिले अशा कुष्ठरोगी, निराधार, अंध, अपंग, मतिमंद व्यक्तींना जवळ करून त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण केला. अशा माणुसकीचे आदर्श व पवित्रस्थळ म्हणजे आनंदवन. १६ जून १९४९ या दिवशी श्रद्धेय बाबा आणि ताई यांनी आनंदवन सुरू केले. आज सात दशकांच्या अथक आणि अविरत प्रवासानंतर लाखो कुष्ठरुग्ण, अंध, अपंग, मूकबधिर, कर्णबधिर, आदिवासी, अनाथ बांधव तसेच समाजातील इतर अनेक दुर्लक्षित घटक आदींचे उपचार, प्रशिक्षण आणि मानसिक, सामाजिक व आर्थिक पुनर्वसन यामुळे संपूर्ण जगाच्या नकाशावर आनंदवनने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. नवनिर्मितीचे, आत्मनिर्भरतेचे किंबहुना सामाजिक संस्काराचे प्रतिक बनलेले हे आनंदवन शारीरिक अपंगत्व असलेल्या प्रतिभावंत कलावंतांना आपल्या कलागुणांच्या अभिव्यक्तीसाठी एक समर्थ व्यासपीठ बनले आहे. जुलै २००२ मध्ये आनंदवनातील विकासाच्या स्वरलतांनी श्रमतिर्थ बहरले आहे. श्रमतिर्थाच्या विकासात स्वरलतांची बहार स्वरानंदवन या प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. या काळात डॉ.विकासभाऊ स्वतः स्वरानंदवन सभागृहात येऊन बसायचे. गाण्याला चाली बसवायचे. सुरुवातीच्या काळात या चमूकडे स्वतःचे वाद्यवृंद नव्हते. जे होते त्यावर काम भागणारे नव्हते. त्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला. ही समस्या सोडविण्यासाठी बाबांच्या कार्याने प्रभावित झालेल्या युनिसेफच्या (मुंबई) तत्कालीन प्रमुख विजयाताई चव्हाण यांनी मोलाची मदत केली.ज्यांचे संगीताचे ज्ञान शालेय शिक्षणातून मिळणाऱ्या संगीताच्या तासापुरते मर्यादित होते. त्यातून वाद्यवृंदांची निर्मिती करणे व ती व्यावसायिक पातळीवर यशस्वी करणे हे फार मोठे आव्हान होते. ते भाऊंनी स्वीकारले. रात्रंदिवस मेहनत करून त्यांना पाहिजे ते प्रशिक्षण देण्यात आले. आणि संगीताच्या सर्व अंगांना प्रकट करणारा गानविलास साधला गेला. गाण्यांच्या ब्रेल लिपीतून नकला केल्या गेल्या. शब्दांचे उच्चार कलाकारांना शिकविण्याची सर्वात अवघड कामगिरी भाऊंनी आपल्या हाती घेतली. हिंदी किंवा उर्दू शब्दांमध्ये प्रत्येक शब्दाला एक वेगळी नजाकत असते. त्याप्रमाणे तो पोज करावा लागतो. भाऊंनी कठोर परिश्रम घेत गायक - गायिकांना कंठस्थ करायला लावले. शब्दांवर पकड आली. सुरांनी जवळीक साधली, स्वरांना ताल आला आणि स्वरानंदनची वाटचाल सुरू झाली.शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या व्यक्ती योग्य मार्गदर्शन व दिशा लाभल्यास काय करू शकते याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे जागतिक कीर्तीचे थोर समाजसेवक श्रद्धेय बाबा आमटे यांचे जेष्ठ पुत्र तथा महारोगी सेवा समिती वरोरा चे सचिव डॉ विकास आमटे यांनी निर्माण केलेला स्वरानंदवन आर्केस्ट्रा म्हणता येईल.स्वरानंदवन आर्केस्ट्रा म्हणजे आनंदवनातील दिव्यांगांनी एकत्र येत निर्माण केलेली स्वाभिमानाची मुहूर्तमेढ रोवणारी अविस्मरणीय कलाकृती आहे.ज्यामुळे दिव्यांग कलाकारांच्या जगण्याला एक वेगळा अर्थ लाभला आहे. स्वरानंदवन हा केवळ कर्मणुकीचा कार्यक्रम नाही. समाजाने समाजाच्या हितासाठी लढायला हवे याची शिकवण देणारा हा कार्यक्रम आहे. दिव्यांगांवर दया नको, संधी द्या असा संदेश देणारी अविस्मरणीय कलाकृती आहे.स्वरानंदवनद्वारे अपंग कलाकारांची निरोगी हृदय समाजमनाशी जोडली जाऊन मैत्रीची नवी संकल्पना बाळसे धरू लागली आहे. त्यामुळे सर्वांच्या जीवनाला ध्येय लाभले आहे, एक दिशा मिळाली आहे. जातपात, धर्म,भाषा, प्रांत ही सर्व बंधने झुगारून सादर केलेला मुक्त कलाविष्कार म्हणजे आनंदवनातील स्वरानंदन ऑर्केस्ट्रा होय. अपंगांनी समाजातील सुदृढांना बदलायला शिकवावे. अंधांनी त्यांना डोळसवृत्ती द्यावी. कर्णबधीरांनी त्यांना काय चांगलं ऐकावे याचा वस्तुपाठ घालून द्यावा अशी या कार्यक्रमाची मूळ संहिता आहे. जात-पात धर्म,भाषा प्रांत भेद ही सर्व बंधने झुगारून सादर केलेला हा मुक्त कलाविष्कार आहे. स्वतःच्या अपंगत्वावर मात करीत सादर केलेला संगीतमय अविष्कार म्हणजे स्वरानंदवन.सुरूवातीला या कार्यक्रमाला ऑर्केस्ट्रा म्हणून लोक ओळखायचे. परंतु डॉ. विकासभाऊंना या कार्यक्रमाला ऑर्केस्ट्रा म्हटलेले आवडत नव्हते. या उपक्रमाला काहीतरी वेगळे नाव द्यावे असे त्यांच्या मनात होते. ती खंत ओळखून आवाज की दुनिया चे श्री.अशोक हांडे यांनी डॉ विकास आमटे यांच्या या ऑर्केस्ट्राचे स्वरानंदवन असे नामकरण केले. जे आज देशविदेशात सर्वपरिचित झाले आहे.तीन तासांच्या संगीत, नृत्याच्या विविधतेने जपलेल्या या कार्यक्रमात सुजाण प्रेक्षकांतील बधिरता घालविण्याचे वेगळे सामर्थ्य आहे. स्वाभिमानाने व स्वावलंबनाने जगण्याची वृत्ती येथे प्रत्येक कलाकाराच्या कलाविष्कारातून प्रतीत होते. आम्हास दान नको, संधी द्या हा संदेश या कार्यक्रमातून दिला जातो. या कार्यक्रमातून आनंदवनातील रोगमुक्त झालेले कुष्ठरोगी, अंध, अपंग, व कर्णबधिर आणि शारीरिक अपंगत्व असलेले अनेक दिव्यांग कलाकार मराठी व हिंदी भाषेतील लोकप्रिय गाणी, आसामी बांबू नृत्य, आदिवासीनृत्य, नकला, लोकनृत्य, विविध पक्षांचे आवाज अशा विविधरंगी कार्यक्रमांची रेलचेल तीन तास करतात. ह्या सदिच्छा अभियानास (ऑपरेशन गुडवील) पाठबळ देऊन ह्या व्यक्तींना नवीन क्षेत्र गाठण्याची संधी समाजाने द्यावी असे भाऊंना वाटते. समाजाने टाकून दिलेल्या, फेकलेल्या लोकांचे पुनर्वसन करणे, त्यांच्यात जगण्याची नवी उमेद आणणे, आत्मविश्वास निर्माण करणे. एवढीच तळमळ विकासभाऊत आहे. स्वतः त्या लोकांच्यात बसून कार्यक्रमाच्या शेवटी भाऊ ज्या तळमळीने गातात व त्या कलाकारांचेच होऊन जातात आणि स्वतःबरोबर समोरच्यालाही केव्हा रंगमंचावर खेचून आणतात हे कळत नाही. परिसरात असलेले कुष्ठरोगी सतत डोळ्यासमोर असलेल्या विकासभाऊंची येथील रुग्णांकडे बघण्याची दृष्टी फार वेगळी आहे. त्या रुग्णांना बरे होण्यासाठी आत्मविश्वास कसा देता येईल याचा विचार भाऊ सतत करत असतात. त्यासाठी त्यांनी अनेकांचा विरोध पत्करून स्वरानंदवनची निर्मिती केली. १५ ऑगस्ट, २००२ यावर्षी स्वरानंदवन चा पहिला प्रयोग आनंदवनचे शुभचिंतक असलेल्या अमरावती येथील डॉ. गोविंद कासट यांच्या पुढाकाराने वनिता समाज अमरावती येथे संपन्न होऊन स्वरानंदवनची महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेशसह अनेक ठिकाणी घौडदौड सुरू आहे. आजतागायत ३ हजारांहून अधिक प्रयोग सादरीकरणाचा उच्चांक स्वरानंदवनने गाठला आहे. निसर्गाकडून अन्याय झालेल्या असंख्य माणसांची मने बलवान करण्याचे कार्य आनंदवनात अव्याहतपणे सुरू आहे. जोपर्यंत अंधअपंग, कुष्ठरोगी यांना समाजात मानाचे स्थान मिळत नाही तोपर्यंत आनंदवनाचे महत्त्व टिकणे आवश्यक आहे. आजच्या तरुण पिढीजवळ ध्येय आहे पण दिशा नाही. विफलतेच्या भावनेने त्यांना पछाडले आहे असे बाबा नेहमी म्हणत असत. ध्येयवादी पण दिशा नसलेल्या तरुणांना उर्जा देणारे एक तीर्थक्षेत्र म्हणजे आनंदवन. ध्येयधुंद तरुणांना येथे कर्तव्य आणि कर्माची दिशा मिळते. स्वरानंदवन म्हणजे सूर सोहळ्याचे नुसते दैदिप्यमान सादरीकरण नव्हे तर त्याचे संयोजन, नीटनेटकेपणा, शिस्तबद्धपणा अनुकरणीय आहे.डॉ. विकास आमटे यांच्या दूरदृष्टीमुळे रोगमुक्त कुष्ठरोगी, अंध, अपंग, कर्णबधिर तसेच मुक्या अशा ज्या व्यक्तींच्या पुनर्वसनाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. अपंग व्यक्तींचे आपसातील विवाह आणि अपंग व्यक्तीशी इतरांचे विवाह यामुळे निवासाच्या योग्य व्यवस्थेची सामाजिक गरज निरंतरपणे वाढली आहे. दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन हा उद्देश असलेल्या या कार्यक्रमातून स्वबळावर दिव्यांगांचे स्वयंपूर्ण हिम्मतग्राम उभारण्याचा भाऊचा संकल्प आहे. ज्यामध्ये सर्वसोयींनी युक्त अशी किमान १०० घरे असतील. पुढे भविष्यात ते कलाकारांचं कलाग्राम म्हणून ओळखले जाईल.यासोबतच हा कार्यक्रम परदेशातील संगीतप्रेमींना दाखविण्यासाठी ते प्रयत्नरत आहेत. काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांचे हे नियोजन समोर जात आहे. स्वरानंदवनने बेरोजगारांना काम दिले लोकहिताला लोकशिक्षण आणि समाज प्रबोधन हे ध्येय असलेल्या या कार्यक्रमाबद्दल स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही दिव्यांगांबद्दल लोकांच्या मनात असलेले गैरसमज व भ्रामक कल्पना दूर करण्यासाठी भाऊंच्या स्वप्नातील स्वरानंदवन प्रयत्नशील आहे.डॉ. विकासभाऊं यांच्या स्वप्नातील या ड्रीम प्रोजेक्टला शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त श्री. शिवशंकरभाऊ पाटील, रयत शिक्षण संस्थेचे रावसाहेब शिंदे, जगप्रसिद्ध धर्मगुरु दलाई लामा यांच्यासह शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, लावणी सम्राज्ञी सुलोचनाताई चव्हाण, शास्त्रीय गायिका पद्मजा फेनानी, सुप्रसिद्ध गझलगायक जगजीतसिंग, भिमराव पांचाळे, सिनेअभिनेता मकरंद अनासपुरे, गीतकार गुलजार यांच्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विलासराव देशमुख,आर.आर.पाटील यांच्यासह अनेकांनी स्वरानंदवन या उपक्रमाला सदिच्छा व्यक्त करीत कौतुक केले आहे. क्षितिजाच्या पलीकडे झेप घेण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती असतानाही अंध, अपंग, दुःखीकष्टी, लुळेपांगळे, वृद्ध निराशेत डोळ्यातील अश्रूंना वाट मोकळी करून केवळ अंधारयात्रेत सामील व्हायचे. एका अफाट दुःखाला मायेची उब देण्याऐवजी समाजात त्यांना आणखी हिडीसफिडीस केले जायचे. परंतु डॉ. विकास आमटे यांनी वेदनेशी नाते जोडल्यामुळे आनंदवनातून आलेला हा आत्मविश्वासात्मक स्वरानंदवन कार्यक्रम अश्रू, घाम, रक्त यांची तेजस्वी कहाणी घेऊन आला आहे. ही अवघ्या तरुणाईसाठी स्फूर्तीदायक बाब आहे. डॉ. विकास आमटे आणि स्वरानंदवन हे अद्वितीय नाते आहे. त्यांना वेगळे करून चालणार नाही. आनंदवनच्या पडत्या काळात स्वरानंदवनने आनंदवनाची आर्थिक बाजू भक्कमपणे सांभाळली आहे. आज डॉ. विकासभाऊ वयाची ७६ वर्षे पूर्ण करीत आहेत. बाबा आमटे यांच्या स्वप्नातील विविध स्वप्ने महारोगी सेवा समितीच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी त्यांना निरोगी आणि निरामय आरोग्य लाभो हीच या निमित्ताने सदिच्छा व्यक्त करतो.

# मराठीची मानगूट; इंग्रजीचे भूत!

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होऊन गेली. त्यानंतर मराठी माणसाचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य होऊनही आता सहा दशके उलटून गेली. वर्षभरात जेव्हा जेव्हा संधी मिळते, तेव्हा मराठी भाषेचे गोडवे गाण्याची आपल्याकडे प्रथा आहे. त्यात सरकारही सामील असतेच. किंबहुना, अनेकदा मराठीचा गजर करण्यासाठी सरकारच पुढाकार घेत असते. मात्र, राज्यातल्या कोणत्याही सरकारला केंद्र सरकारकडून मराठी भाषेसाठी अभिजात भाषेचा दर्जा काही मिळविण्यात यश आलेले नाही. इतकेच नव्हे तर, महाराष्ट्रात प्रत्येक शाळेत मराठी शिकविण्याची सक्तीही फारशी गंभीरपणे अमलात आलेली नाही. एकतर, विद्यार्थ्यांच्या मराठीच्या ज्ञानाची अत्यंत जुजबी चाचणी आणि मराठी न शिकविणाऱ्या शाळांना किरकोळ दंड करून मिळणारे अभय, अशी मराठीची शैक्षणिक अवहेलना चालू असताना आता सरकारचा नवा उपद्व्याप पुढे आला आहे. तोही मराठीचे भाषा म्हणून कल्याण करणारा नाही. राज्यातल्या जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थी यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान अद्ययावत आणि अचूक असावे, यासाठी 'रिसोर्स पर्सन' म्हणजे 'साधन अध्यापक' नेमण्याचा निर्णय झाला आहे. शिक्षण व्यवस्थेत रिसोर्स पर्सन म्हणजे एका अर्थाने प्र-पाठक असतात. या प्र-पाठकांनी आधी शाळांमधल्या शिक्षकांचे प्रबोधन करावे आणि नंतर या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे, अशी रीत अनेक दशके चालू आहे. मात्र, आता राज्य सरकारच्या पवित्र या पोर्टलवर आलेल्या जाहिरातीनुसार राज्यातल्या शिक्षकांच्या इंग्रजीच्या अध्ययनासाठी त्यांना शिकविणारे



'साधन अध्यापक' इंग्रजी माध्यमांत शिकलेले असावेत, अशी अट घालण्यात आली आहे. ही अट अर्थातच अन्यायकारक असून ती सरकारने मागे घ्यायला हवी.मुळात शिक्षकांना शिकवायचे असते ते मुळात शिकविण्याचे तंत्र. त्यात भाषाज्ञानाला महत्त्व असतेच. मात्र, एखादा साधन अध्यापक म्हणून काम करू इच्छिणारा शिक्षक समजा मराठी माध्यमात शिकला असेल आणि नंतर त्याने बीए, एमए तसेच एम. फिल. किंवा डॉक्टरेट इंग्रजीत केली असेल तो नव्या अटीनुसार अपात्रच ठरेल. मुळात कोणत्या माध्यमात शिक्षण झाले आहे, यापेक्षा ते कसे झाले आहे आणि शिकणाऱ्या व्यक्तीने ते शिक्षण किती गंभीरपणे घेतले आहे, हे महत्त्वाचे नसते का? केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकल्यामुळे इंग्रजी ही भाषा आणि इंग्रजी हे अध्ययन व अध्यापनाचे माध्यय या शिक्षकांना नेमके समजले असेल, असे गृहित कसे काय धरता येईल? महाराष्ट्रात इंग्रजी शाळांचे खूळ वाढले असले आणि त्यामुळे तशा शाळांचे पेव फुटले असले तरी त्यामुळे राज्यात इंग्रजीचे भाषा म्हणून उत्तम ज्ञान अवगत झालेले लाखो पदवीधर तयार झाले आहेत, असा कुणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. काही महिन्यांपूर्वी बनावट प्रमाणपत्र मिळवून राज्यात किती शाळा चालत आहेत, याची एक आकडेवारी प्रकाशित झाली होती. यात बहुसंख्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. त्या केंद्रीय बोर्डांचे अध्यापन करीत असल्याचाही दावा करीत होत्या. मात्र, या शाळा बनावट किंवा अनधिकृत असल्याचे उघड झाले होते. अशा बनावट शाळांमध्ये इंग्रजी माध्यमांचे विद्यार्थी काय शिकत असतील? मग केवळ एखादा विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकला म्हणून पुढे त्याला अध्यापक म्हणून

एखाद्या भाषेवर प्रभुत्व हे केवळ त्या माध्यमात शिकल्याने निर्माण होत नाही. त्यासाठी, त्या भाषेची रचना, त्या भाषेचे व्याकरण, तिचे प्रचलन, तिच्यात विचार करण्याची क्षमता, विचार व्यक्त करण्याची कला असे सारे आवश्यक असते. केवळ माध्यम म्हणजे हे सारे गुण आत्मसात होण्याची हमी नाही. हा विषय सरकारला छोटा किंवा कमी महत्त्वाचा वाटत असेल. मात्र, इंग्रजीच्या महाराष्ट्रावरील छुप्या किंवा उघड आक्रमणाचाच हा प्रकार आहे. आपण किती परभृत विचार करतो, याचीही ही खूण आहे. त्यामुळेच, मराठी भाषेसाठी सातत्याने आवाज उठविणारे अभ्यासक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. 'मराठीच्या व्यापक हितासाठी..' असे एक व्यासपीठ जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तयार केले आहे. या संस्थेनेही या निर्णयातील गफलतीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. साधन अध्यापक नेमताना त्याचे इंग्रजीवर प्रभुत्व हवे, अशी अपेक्षा करणे चूक नाही. हा निकष सर्वच विषयांच्या साधन अध्यापकांना नेमण्यासाठी करणे आवश्यक आहे. मात्र, इंग्रजीवर प्रभुत्व असणे आणि संबंधित व्यक्तीचे शिक्षण इंग्रजी माध्यमातच झालेले असणे, या दोन बाबींचा काहीही संबंध नाही. राज्य सरकारने हा तुघलकी निर्णय मागे घ्यावा. मराठीच्या मानगुटीवर कोणत्याही निमित्ताने इंग्रजीचे भूत बसविलेच पाहिजे, असे नाही. इतकी समज संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर सहा दशकांनी तरी यायला काय हरकत आहे?

# 'एनईपी' नावाची जादूची कांडी!

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) जाहीर होऊन तीन वर्षे झाली असली, तरी त्याच्यातील नावीन्य आणि कवित्व अद्याप संपलेले नाही. पंतप्रधानांपासून शिक्षणमंत्र्यांपर्यंत आणि कुलगुरूंपासून नोकरशहांपर्यंत अनेक मंडळी वेगवेगळ्या व्यासपीठांवर या धोरणाच्या अनुषंगाने वक्तव्ये करीत आहेत.'एनईपी' म्हणजे जणू जादूची कांडी असून, ते प्रत्यक्षात आल्यानंतर देशातील शिक्षणाची गुणवत्ता आपसूक उंचावेल, असा भास काही जण निर्माण करीत आहेत; तर या धोरणामुळे शिक्षणाचे बाजारीकरण वाढण्याची आणि त्यामुळे समाजातील विषमतेची दरी रुंदावणार असल्याची भीती विरोधक व्यक्त करीत आहेत. शिक्षणात राजकारण आणू नये, असे म्हटले जात असले, तरी खुद्द शिक्षण ही एक राजकीय प्रक्रियाही असल्यामुळे त्यामागील राजकारणावर चर्चा व्हायलाच हवी. त्यामुळे नवीन शिक्षण धोरणाची पूर्णांशाने अंमलबजावणी होण्याच्या आधी त्यातील गुण-दोषांची मीमांसा व्हायला हवी, आणि दोष दूर करण्याची सरकारची तयारीही हवी. सरकारमधील मंडळींची वक्तव्ये पाहता दोषनिवारणाची त्यांची तयारी दिसत नाही. धोरण प्रत्यक्षात आणण्याची त्यांना झालेली घाई मात्र ठळकपणे दिसून येते. चालू शैक्षणिक वर्षात 'एनईपी'ची अंमलबजावणी होईल, अशी वातावरणनिर्मिती केली गेली; परंतु तसे होऊ शकले नाही. आता पुढील वर्षात म्हणजे २०२४-२५मध्ये हे धोरण राबविले जाईल, असे सांगितले जात आहे. त्यासाठी संबंधित घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी एक नवा मार्ग शोधला आहे. तो म्हणजे चक्क तंबी देण्याचा! 'एनईपी'ची अंमलबजावणी न केल्यास महाविद्यालयांना विद्यापीठांची संलग्नता मिळणार नसल्याचा इशारा पुण्यातील एका कार्यक्रमात त्यांनी नुकताच दिला. धोरण प्रत्यक्षात यावे, हा आग्रह समजण्यासारखा असला, तरी त्यांचा इशारा अनाकलनीय म्हणावा लागेल; कारण अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांना नव्हे, तर सरकारला, विशेषत: विद्यापीठांना तयारी करायची आहे. अंमलबजावणीचा कार्यक्रम योग्य पद्धतीने राबविला तर महाविद्यालये आपसूक अंमलबजावणी करतील.कागदावरील धोरण प्रत्यक्षात साकारणे ही अतिशय अवघड बाब. अयोग्य अंमलबजावणीमुळे अनेक चांगली धोरणे कशी अपयशी ठरली याची अनेक उदाहरणे देता येतील. देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करीत असल्याचा दावा करून आणलेल्या नवीन शिक्षण धोरणाची अंमलबजावणी म्हणूनच अधिक आव्हानात्मक ठरते. बालवाड्यांना औपचारिक शिक्षणाच्या चौकटीत आणण्यापासून पदवी शिक्षणाच्या स्वरूपात बदल करण्यापर्यंत आणि सर्व शाखांचे शिक्षण मातृभाषेतून देण्यापासून विद्यार्थ्यांना अनेक पर्याय देण्यापर्यंतच्या बाबी या धोरणात आहेत. नवनवीन संकल्पनांचा आणि संज्ञांचा भडीमार असलेले हे धोरण कार्यानुभव, संशोधन यांबद्दलही भाष्य करते. या सर्व गोष्टी साकारण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मातृभाषेतून शिक्षण द्या, असे म्हणणे सोपे आहे; परंतु त्यासाठी संबंधित विषयातील ज्ञान देशातील सर्व भाषांमध्ये आणणे आवश्यक ठरते. यंत्राद्वारे भाषांतर करून घेण्याचे तंत्र विकसित झाले असले, तरी अनेक भारतीय भाषांसाठी ते बाल्यावस्थेत आहे. असे भाषांतर क्लिष्ट आणि अनेकदा हास्यास्पद होते. त्यामुळे त्याचा उपयोग नाही. कार्यानुभवाची संकल्पना चांगली असली, तरी त्यासाठी कार्यसंस्कृती विकसित होण्याची आवश्यकता आहे. धोरणामध्ये नमूद केलेल्या प्रत्येक गोष्टींसाठी सुविधा विकसित कराव्या लागणार आहेत. त्या न करता घाईघाईने धोरणाची अंमलबजावणी केल्यास ती फसण्याची शक्यता अधिक.या धोरणातील दोष दूर करण्याची वेळ अजूनही गेलेली नाही. मुख्य म्हणजे शिक्षण हक्क कायदा आणि घटनात्मक तरतुदी यांचे उल्लंघन होणार नाही हे पाहावे लागेल. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरांवर धोरणाने दिलेला भर रास्त असला, तरी या परंपरांबद्दल अभिनिवेशच अधिक दिसतो. तो कमी करून, विज्ञानाच्या कसोट्यांवर टिकणारे ज्ञान जरूर द्यायला हवे. मात्र, त्यासाठीही तयारी करावी लागेल. बालवाड्यांतील शिक्षणाला महत्त्व देणे आवश्यकच होते; परंतु त्या सक्षम करण्याची आणि तेथील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचीही आवश्यकता आहे. काळानुरूप शिक्षणावर भर देणाऱ्या या धोरणात शिक्षणावरील खर्चाबद्दलची कोणतीही कटिबद्धता नाही. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च केली जावी, या कोठारी आयोगाने पन्नासहून अधिक वर्षांपूर्वी केलेल्या शिफारशीचा केवळ एका ओळीचा उल्लेख धोरणात आहे; परंतु त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह नाही. शिक्षणावरील खर्च 'जीडीपी'च्या तीन टक्क्यांच्या घरात असताना, 'एनईपी'ला अभिप्रेत असलेल्या सर्व सुधारणांसाठी पैसे कोठून आणणार हा प्रश्न पडतो. या पार्श्वभूमीवर 'एनईपी'च्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांना नव्हे, तर खुद्द सरकारला अधिक तयारी करण्याची गरज आहे.

# अजितदादांचे मिटकरी आंबेडकरांच्या भेटीला:दोन्ही नेत्यांत जवळपास अर्धा तास बंद दरवाज्याआड चर्चा

**अकोला । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर अजित पवार यांचे विश्वासू मानल्या जाणाऱ्या आमदार अमोल मिटकरी यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांत अकोल्यात बंद दरवाज्याआड चर्चा झाल्यामुळे राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.प्रकाश आंबेडकर व अमोल मिटकरी यांच्यात बुधवारी सकाळी १० वा. अकोल्यातील बाळासाहेबांच्या यशवंत निवासस्थानी भेट झाली. दोन्ही नेत्यांत जवळपास अर्धा तास बंद खोलीत चर्चा झाली. त्यामुळे या भेटीचा तपशील समजला नाही. पण या भेटीविषयी विविध तर्कवितर्क लढवण्यात येत आहे.या भेटीविषयी अमोल मिटकरी यांना छेडले असता त्यांनी ही राजकीय भेट नसल्याचे स्पष्ट केले. मी बाळासाहेब आंबेडकरांना धम्मचक्र प्रवर्तन



दिन व दसऱ्याच्या शुभेच्छा देण्यासाठी भेट घेतली. मी गत ५ वर्षांपासून त्यांना भेटण्यासाठी येथे येतो. यंदाही आलो. ही भेट राजकीय नव्हे तर सामाजिक दृष्टिकोनातून होती. मी काही पुस्तकेही त्यांना भेट दिली, असे मिटकरी म्हणाले.आंबेडकरांनी शरद पवारांच्या भेटीनंतर तुमची भेट घेतली त्यामुळे या भेटीला काही विशेष महत्त्व आहे का? असा प्रश्न यावेळी त्यांना विचारण्यात आला असता त्यांनी असे काहीही नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या द प्रॉब्लेम ऑफ रुपी या प्रबंधाला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी कॉफी घेण्याची विनंती केली. त्या विनंतीनुसार शरद पवार व बाळासाहेबांसह जवळपास १० ते १२ जणांनी एकत्र कॉफी घेतली. त्या कॉफीच्या भेटीचा व माझ्या आजच्या भेटीचा कोणताही संबंध नाही, असे मिटकरी यांनी स्पष्ट केले.मी राजकीय नेता म्हणून केव्हाच बाळासाहेब आंबेडकरांना भेटत नाही. ते बाबासाहेबांचे वारस आहेत. त्यांच्यासोबत राजकीय मुद्यांवर चर्चा करावी एवढा मी मोठा माणूस नाही, असेही अमोल मिटकरी यावेळी म्हणाले.यावेळी पत्रकारांनी प्रकाश आंबेडकर यांच्याशी या भेटीविषयी प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले की, मिटकरी विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी आले होते. तुम्ही त्याला राजकीय भेट देत असाल तर ही दुर्दैवी गोष्ट आहे.

# शिंदे यांचे संपूर्ण भाषण भाजपला मजबूत करण्यासाठी–खा.संजय राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांचे संपूर्ण भाषण भाजपला मजबूत करण्यासाठी होते, अशी टीका उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केली आहे. शिंदे यांच्या दसरा मेळाव्यात भाजपने भाड्याने लोक पाठवली होती, असा आरोपही संजय राऊत यांनी केला. एकनाथ शिंदे यांचे संपूर्ण भाषण हे भाजपचे विचार होते, त्यांनी भाजपसाठीच हा मेळावा घेतला असल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला आहे.आम्हाला न्यायालयाच्या निर्णयाची आवश्यकता नाही. तर जनतेच्या दरबारात चला. खरी शिवसेना कोणाची याचा निर्णय आता जनतेच्या दरबारातच व्हायला हवा, असा इशारा देखील खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांना दिला. कालच्या दसऱ्या मेळाव्यात झालेल्या भाषणावरुन संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ठाकरेंच्या दसरा



मेळाव्याला शिमगा म्हणतात, तर काय बिघडले. शिमगा हा आमचा म्हणजेच हिंदूंचा सण आहे. संघ परिवाराने आता नवीन सण शोधून काढले आहेत का? असा सवालही संजय राऊत यांनी उपस्थित केला.शिंदे यांना मराठा समाजाला आरक्षण द्यावेच लागेल. आता शपथा खात आहात. पण त्यांच्या शपथांकडे लक्ष द्यायची आवश्यकता नाही. शिंदे हे भाजपच्या सांगण्यावरुन काम करतात. ते भाजपसोबत गेल्यापासून खोटे बोलू लागले असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. शिंदे यांचे काम भाजपच्या विचारावर चालते, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे. शिंदे यांना खोट्या शपथा खायची सवय आहे. त्यांनी शिवसेनेशी एकनिष्ठ राहण्याचीही शपथ घेतली होती. उद्धव ठाकरे यांना बदनाम करण्यासाठी सरकारचा खटाटोप सुरू असल्याचा आरोपही संजय राऊत यांनी केला आहे. बेकायदा सरकार बनवून महाराष्ट्राची बदनामी केली जात असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

# सोलापूरचा पाणीपुरवठा विस्कळित; लांबोटीजवळ फुटली मुख्य उजनी जलवाहिनी

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर- पुणे महामार्गावरील लांबोटी येथे उजनी – सोलापूर मुख्य जलवाहिनीला बुधवारी (ता. २५) दुपारी साडेतीनच्या सुमारास गळती लागली. अचानक लागलेल्या गळतीमुळे परिसरात सर्वत्र पाणीच पाणी झाले. उंचच उंच फवारे उडत होते. मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले. दरम्यान महापालिकेच्या आरोग्य अभियंता विभागाने युद्ध पातळीवर गळती दुरुस्ती करण्याच्या कामाला सुरवात केली.गळतीच्या परिणामातून दोन ते तीन दिवस पाणीपुरवठा विस्कळित होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. पावसाळ्यात सोलापूर जिल्ह्याला म्हणावा तसा पाऊस झाला नाही. एकीकडे उजनी ५८ टक्यांवर आले आहे. दुसरीकडे सोलापूर शहराला पाणीपुरवठा ऐन सणासुदीच्या काळात विस्कळित होत चाललेला आहे.दरम्यान, बुधवारी दुपारी अचानक लांबोटी पुलाजवळ सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनीला गळती लागली. यामुळे दीडशे ते दोनशे फूट उंच पाण्याचे फवारे उडत होते. येणारे जाणारे नागरिक मोबाईल मध्ये पाणी गळतीचा व्हिडिओ घेत होते.सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आणि महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागास माहिती मिळताच तातडीने पाणीपुरवठा अधिकारी नीलकंठ मठपती व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.येथे जलवाहिनीला दोन दिवसांपूर्वीच छोटी गळती लागली होती. महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून व प्रत्यक्ष भेटूनदेखील याची कल्पना दिली होती. मात्र, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी याकडे पूर्णतःदुर्लक्ष केले.छोट्या गळतीचे बुधवारी सकाळी जलवाहिनी फुटण्यात रूपांतर झाले. बुधवारी सकाळी जलवाहिनी फुटल्याचे महापालिका प्रशासनास सांगितल्यानंतर तत्काळ त्याची दुरुस्ती न करता सायंकाळी साधारणतः ५ वाजण्याच्या सुमारास दुरुस्तीसाठी कर्मचारी आले. दोन दिवस लागलेल्या गळतीकडे महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्यानेच जलवाहिनी फुटली. जलवाहिनीच्या गळतीमधून २.५ एकर ज्वारीच्या पिकाचे पूर्ण नुकसान झाले. जलवाहिनी फुटण्यातून आमच्या ज्वारी पिकाचे नाहक नुकसान झाले.

# जेऊर ग्रामपंचायत निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष; सरपंच पदासाठी तिरंगी लढत

**करमाळा । प्रतिनिधी**

जेऊर (ता.करमाळा )ग्रामपंचायत निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.जेऊर ग्रामपंचायतीवर माजी आमदार नारायण पाटील यांची १९९२ पासून एकहात्ती सत्ता आहे. जेऊर ग्रामपंचायतचे सरपंच पद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव आहे.


या ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी माजी आमदार नारायण पाटील यांचे चिरंजीव युवा नेते पृथ्वीराज पाटील हे निवडणूक रिंगणात उतरले असून त्यांच्या विरोधात आमदार संजय शिंदे गट व इतर पाटील विरोधक यांनी नितीन भैरू खटके यांना उमेदवारी दिली आहे.याशिवाय बाळासाहेब एकनाथ करचे हे सरपंच पदासाठी अपक्ष निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे जेऊर ग्रामपंचायतची सरपंच पदाची निवडणूक तिरंगी होत आहे अपक्ष उमेदवार बाळासाहेब करचे यांनी गेली अनेक वर्षापासून जेऊर ग्रामपंचायतच्या कारभारावर आक्षेप घेत मोठा लढा उभारला होता.सरपंच पदाची जागा ओबीसी साठी राखीव असल्याने या जागेवरती ओबीसी उमेदवारालाच प्राधान्य द्यावे अशी मागणी बाळासाहेब करचे यांची होती. त्यांची ही मागणी मान्य झाल्याने ते निवडणूक रिंगणात उतरले असल्याचे सांगण्यात येत आहेग्रामपंचायत सदस्य संख्या १५ असून जेऊर ग्रामपंचायतचे एकूण मतदान ५०५४ एवढे आहे. जेऊर ग्रामपंचायत निवडणूकीत सर्व पाटील विरोधकांना एकत्र करण्यासाठी आमदार शिंदे गटाकडून माजी पंचायत समिती सभापती चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील व इतर शिंदे समर्थकांनी प्रयत्न केले. मात्र सरपंच पदासाठी बाळासाहेब करचे यांचा उमेदवारी अर्ज राहिला आहे.जेऊर ग्रामपंचायत निवडणुकीसाठी माजी आमदार नारायण पाटील विरोधक माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील यांचे चिरंजीव संग्राम पाटील हे सरपंच पदाची निवडणूक लढवतील असा अंदाज व्यक्त केला जात होता.पृथ्वीराज पाटील विरूद्ध संग्राम पाटील या दोन्ही पाटलांमध्ये ही निवडणूक होईल असे वाटत असतानाच आमदार संजय शिंदे समर्थकांनी नितीन खटके यांची उमेदवारी एकमताने जाहीर केली. संग्राम पाटील यांनी उमेदवार अर्ज भरला नाही. संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून नितीन खटके हे गेले अनेक वर्ष काम करत आहेत.त्याचा जनसंपर्क चांगला आहे. विविध सामाजिक उपक्रम राबवण्यावर त्यांचा भर असतो.१९९२ ला सुरुवातीला आमदार माजी आमदार नारायण पाटील हे जेऊर ग्रामपंचायतचे सरपंच झाले .तेव्हापासून जेऊर ग्रामपंचायत वरती पाटील यांची सत्ता आहे.नारायण पाटील यांची जेऊर ग्रामपंचायत घालवण्यासाठी यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये बागल यांनी मोठी ताकद लावण्यात आल्याची उदाहरणे आहेत. मात्र प्रत्येक वेळी पाटील यांनी आपली सत्ता राखली आहे . जेऊर येथील बहुतांश बागल गटाचे कार्यकर्ते आमदार संजय शिंदे गटात गेले आहेत त्यामुळे पाटील यांच्या विरोधात लढणारे बहुतांश कार्यकर्ते हे पूर्वीचे बागल समर्थक आहेत.यावेळी पाटील यांचे चिरंजीव स्वतः निवडणूक रिंगणात उतरले असल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली असून पृथ्वीराज पाटील यांच्या विजयासाठी पाटील गटाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत ,तर कोणतेही परिस्थितीत पाटील गटाची सत्ता घालवायची यासाठी विरोधक प्रयत्न करत आहेत. पाटील गटाचे कार्यकर्ते फोडण्यासाठी देखील प्रयत्न सुरू आहेत.त्याच पाटील गाटचे माजी उपसरपंच बलभीम जाधव यांनी आमदार संजय शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे. याची वेळी प्रवेश केलेले माजी उपसरपंच अंगद गोडसे यांनी मात्र आपल्याला फसवून शिंदे गटात प्रवेश घडून आणला माझा त्यांच्याशी काही संबंध नाही मी माझी आमदार नारायण पाटील यांचाच कार्यकर्ता असल्याचे जाहीर केले आहे.या निवडणुकीत होणारे फोडाफोडीचे राजकारण कसे असेल याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.त्यामुळे जेऊर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. माजी आमदार नारायण पाटील यांच्यासमोर सत्ता टिकवण्यासाठी तर पाटील विरोधी गट सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# मोदींनी केलेल्या जुगाडाचा पराभव होतोय:त्यामुळे पंतप्रधानांचे महाराष्ट्रातील दौरे वाढत आहेत–संजय राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्रातील दौऱ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे राज्यात निवडणुकीच्या तारखा जाहीर होतील, असे मत खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी पुन्हा आरक्षण सुरु केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आधी मनोज जरांगे पाटील यांना पंतप्रधानांसमोर नेऊन हा प्रश्न सोडवायला हवे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रात मोदींनी सरकार स्थापन करण्यासाठी जो जुगाड केला आहे, तो हरणार आहे. त्या भीतीपोटी मोदींची महाराष्ट्रातील दौरे वाढले असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. महाराष्ट्रात भाजपची स्थिती अत्यंत गंभीर आणि नाजूक असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रात वारंवार यावे लागत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.जे शिवसेनेचे मुख्यमंत्री असल्याचा दावा करतात, त्यांचे दिल्लीने पायपुसने केले असल्याची टीका



देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सध्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना वारंवार दिल्लीची वारी करावी लागत असल्याचा आरोप देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे.चहा, पाणी, जेवण, झोपू का? असे साधे प्रश्न विचारण्यासाठी मुख्यमंत्र्यांना दिल्लीला जावे लागत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. ही महाराष्ट्राची परंपरा नसल्याचेही संजय राऊत यांनी म्हटले आहे. छोट-छोट्या गोष्टींसाठी मुख्यमंत्र्यांना दिल्लीत जावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी शिवसेनेचा मुख्यमंत्री असल्याचा दावा करु नये. त्यांनी भाजपचा मंडलीक मुख्यमंत्री असल्याचे सांगावे, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.पंतप्रधान नाही तर भाजपचे नेते म्हणून लोकं नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकत असल्याची टीका खासदार संजय राऊत यांनी केली आहे. माझ्या माहितीनुसार लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाला जाण्यास तयार नाही, अशी टीका देखील संजय राऊत यांनी केली आहे. या पूर्वी असे कधी होत नव्हते. नागरिक बाळासाहेब ठाकरे, अटल बिहारी वाजपेयी, पंडीत नेहरु यांच्या कार्यक्रमाला स्वत: गर्दी करत होते. असा दावाही संजय राऊत यांनी केला. यावरुन भाजपने बोध घ्यावा, असा सल्ला देखील त्यांनी दिला.

# मराठा कार्यकर्त्यांकडून गुणरत्न सदावर्ते यांच्या गाड्यांची तोडफोड

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील क्रिस्टल टॉवर परिसरात मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांकडून वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या गाड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. ही घटना गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. विशेष म्हणजे आंदोलक गाड्यांची तोडफोड करत असताना तेथे पोलिसांची उपस्थिती होती. या आंदोलकांनी गाड्या फोडत असताना 'एक मराठा लाख मराठा'अशा घोषणा दिल्या. नंतर पोलिसांनी या आंदोलकांना ताब्यात घेतले. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांचे शांततामय आंदोलनाची हीच व्याख्या का? असा प्रश्न गुणरत्न सदावर्ते यांनी उपस्थित केला आहे.मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलकांना शांततेच्या मार्गाने आरक्षणाचा लढा सुरु ठेवण्याची भूमिका घेतली होती. मात्र, फुलंब्री गावातील काही तरुणांनी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या गुणरत्न सदावर्ते यांच्या मुंबईत घराबाहेर उभ्या असलेल्या गाड्यांची तोडफोड केली. घटनेनंतर पोलिसांनी गाड्यांची तोडफोड करणाऱ्या तीन तरुणांना ताब्यात घेतले. या तरुणांविरोधात गुन्हा देखील दाखल होण्याची शक्यता आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील असलेल्या मंगेश साबळे असे हल्ला करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. मराठा आरक्षणसाठी आंदोलन करत असताना त्यांनी स्वत:ची गाडी पेटवली होती. तेव्हापासून मंगेश साबळे चर्चेत होते. त्यांनी या आधी देखील अनेकदा आक्रमक आंदोलन केले आहे. त्यांच्यासह आणखी दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.मराठा आरक्षणाला विरोध केल्यामुळे गुणरत्न सदावर्ते यांच्यावर हल्ला होऊ शकतो, अशी माहिती पोलिसांना आधीच मिळाली होती. त्यानंतर गुणरत्न सदावर्ते यांच्या सुरक्षेसाठी १० ते १२ पोलिस तैनात करण्यात आले होते. तरी देखील आंदोलकांनी माझ्या घरात घुसण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे.राज्य सरकार केवळ मनोज जरांगे पाटील यांचे ऐकूण कोणताच निर्णय घेऊ शकत नाही, असे मत गुणरत्न सदावर्ते यांनी व्यक्त केले आहे. या विरोधात गावोगावी जाऊन खुल्या प्रवर्गातील तरुणांची भेट घेणार असल्याचे गुणरत्न सदावर्ते यांनी सांगितले आहे. मला शांत करता येणार नाही, असा इशाराही त्यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे.शरद पवार हेच मनोज जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी गेले होते. आता माझ्या आणि कुटुंबावर झालेल्या हल्ल्यानंतर याचे उत्तर शरद पवार यांनी द्यावे, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे. या संदर्भात आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचेही ते म्हणाले. या प्रकरणानंतर मनोज जरांगे पाटील यांना अटक करण्याची मागणी देखील त्यांनी केली.

# ज्येष्ठ कीर्तनकार बाबा महाराज सातारकर यांचे निधन

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. बाबा महाराज सातारकर यांचे आज निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. नवी मुंबईती नेरूळ इथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बाबा महाराज सातारकर यांच्यावर उद्या म्हणजेच शुक्रवारी २७ ऑक्टोबरला संध्याकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.बाबा महाराज सातारकर यांचे पार्थिव आज दुपारी तीन वाजेनंतर अंतिम दर्शनासाठी नेरूळ जिमखाना समोर असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदीरात ठेवण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या मनामनात जेष्ठ निरुपणकार बाबा महाराज सातारकर यांनी स्थान मिळवले होते. आपल्या निरुपणाच्या माध्यमातून त्यांनी अध्यात्माच्या प्रचाराबरोबरच सामाजिक प्रबोधन देखील केले. त्यांचे रोखठोक विचार आणि आचरणाविषयी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले.बाबा महाराज सातारकर यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९३६ रोजी सातारा येथे झाला होता. त्यांनी त्या काळी दहावीपर्यंतचं शिक्षण इंग्रजी माध्यमातून पूर्ण केले. बाबा महाराज सातारकर यांच्या घरी शेकडो वर्षांपासून वारकरी सांप्रदायाची परंपरा होती. विठ्ठलाचे कीर्तन आणि ज्ञानेश्वरी यावर बाबा महाराजांनी आयुष्य घालवले. बाबा महाराजांचं कीर्तन ऐकण्यासाठी राज्यातीलच नव्हे तर देश -विदेशातून भक्त येत होते. मात्र, अलिकडे वय झाल्यामुळे बाबा महाराज कीर्तनासाठी उभे राहाता येत नव्हते. त्यांची ही कीर्तनाची परंपरा त्यांचा नातू पुढे नेत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शिर्डी दौऱ्यावर होते. येथील भाषणात त्यांनी बाबा महाराज सातारकर यांना श्रद्धांजली वाहिली. नरेंद्र मोदी म्हणाले की, हरिभक्त बाबा महाराज सातारकर यांच्या वैकुंठगमनाची दुःखद बातमी मिळाली. त्यांनी कीर्तन प्रवचानातून समाज जागृती केली. ते येणाऱ्या पिढ्यासाठी अनेक युग प्रेरणा देतील. त्यांची प्रेमपूर्वक वाणी, शैली, लोकांचे मन मोहून घ्यायची. त्यांच्या वाणीत जय जय राम कृष्ण हरी भजनाचा प्रभाव आम्ही पाहिला. मी बाबा महाराज सातारकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाबा महाराज सातारकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. ते म्हणाले की, ओघवती, रसाळ वाणी आणि मार्मिक शैलीने घरा-घरात कीर्तनाची गोडी वाढविणारे, भागवत धर्माचे वैश्विक राजदूत, वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू प. पू. गुरुवर्य श्री बाबा महाराज सातारकर यांचे निधन महाराष्ट्राच्या भागवत आणि भक्ती संप्रदायासाठी मोठी हानी आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदे यांनी दुःख व्यक्त केले.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबा महाराज सातारकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त



केला. ते म्हणाले की, ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. बाबामहाराज सातारकर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांचे निधन ही वारकरी संप्रदायाची फार मोठी हानी आहे. वारकरी विचार आणि भागवत धर्म सर्वदूर नेण्यात एक कीर्तनकार म्हणून त्यांनी मोठे योगदान दिले. आवाजातील प्रेमळ आणि आश्वासक भाव तसेच उत्कृष्ट वकृत्व यामुळे त्यांच्या कीर्तन-प्रवचनांमध्ये श्रोते मंत्रगुग्ध होऊन जात. त्यातून मोठा चाहता वर्ग त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभर निर्माण केला. राज्य सरकारने नुकताच 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार त्यांना दिला होता. एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व, संत अभ्यासक आपल्यातून निघून गेले आहेत. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि लाखो भाविकांच्या दुःखात मी सहभागी आहे. ।। हरी ॐ ।।राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बाबा महाराज सातारकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. ते म्हणाले की, ज्येष्ठ निरुपणकार ह. भ. प. बाबा महाराज सातारकर यांची प्राणज्योत मालवली ही बातमी संपूर्ण महाराष्ट्रासाठी दुःखदायक आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ वारकरी कीर्तनकार, प्रवचनकार म्हणून त्यांची ख्याती होती. बाबा महाराज सातारकर यांचा आध्यात्मिक क्षेत्रातील योगदानाचा वाटा मोलाचा होता. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अध्यात्माच्या प्रचार प्रसारासाठी अर्पण केले. रोखठोक वाणी आणि शुद्ध विचार हे बाबा महाराज सातारकर यांचं वैशिष्ट्य. ज्यांच्या कीर्तनाची ख्याती राज्यातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात होती अशा थोर बाबा महाराज सातारकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!!!अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी बाबा महाराज सातारकर यांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेतील ज्येष्ठ कीर्तनकार, अध्यात्मिक क्षेत्रातील व्यासंगी व्यक्तिमत्व बाबा महाराज सातारकर यांच्या निधनाची वार्ता दुःखद आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! आपल्या ओघवत्या कीर्तन शैलीतून त्यांनी वारकरी सांप्रदायाचा विचार समाजापर्यंत पोहचवण्याचे काम प्रभावीपणे केले. त्यांच्या निधनाने वारकरी सांप्रदायाचा महत्त्वाचा आधार हरपला आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या व समस्त वारकरी बांधवांच्या दुःखात मी सहभागी आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो आणि मृतात्म्यास सद्गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!काँग्रेस नेते अशोक चव्हाण म्हणाले की, ज्येष्ठ निरुपणकार, कीर्तनकार ह. भ. प. बाबा महाराज सातारकर यांच्या निधनाने एक आध्यात्मिक, प्रबोधनात्मक जीवनप्रवास थांबला आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्य ईश्वरभक्तीसाठी समर्पित होते. त्यांचे कीर्तन, ज्ञानेश्वरीचे निरुपण भाविकांमध्ये कमालीचे लोकप्रिय राहिले. दूरचित्रवाणीवर कीर्तन घेऊन जाण्याचा पहिला प्रयोग त्यांनी केला. आपल्या शुद्ध वाणीने आणि शुद्ध विचारांनी त्यांनी समाजाला दिशा दिली. त्यांच्या आवाजातील हरीपाठ व जय जय राम कृष्ण हरीचा गजर वर्षानुवर्षे सर्वसामान्यांच्या मनात गुंजत राहिल. त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदाय आणि आध्यात्मिक क्षेत्राची अपरीमित हानी झाली आहे. ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# आष्टी तालुक्यात दोन वेगवेगळ्या भयानक अपघातात १० जण ठार

## आ.सुरेश धस यांची अपघातग्रस्तांना तातडीची मदत



**आष्टी ।प्रतिनिधी**

धामणगावकडून अहमदनगरकडे जात असलेल्या एका ट्रकला दौलावडगाव जवळ व्यंको कंपनीकडे वळण घेत असताना नगरकडे रूग्ण घेऊन जात असलेल्या रुग्णवाहिकेने पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात रुग्णवाहिकेतील डॉक्टरसह चौघांचा जागीच मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघातबीड नगर राज्य वाजता दुसऱ्या अपघातात आष्टी फाटा येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल उलटून सहा प्रवास्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. महामार्गावरील दौलावडगाव नजीक बुधवारी रात्री साडे अकरा वाजेच्या दरम्यान घडला. तर आज सकाळी सहा वाजता दुसऱ्या अपघातात आष्टी फाटा येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल उलटून सहा प्रवास्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा हद्दीतील दौलावडगाव शिवारात दत्त मंदिराजवळ एक ट्रक क्र. एम.एच २१ एक्स ८६००) हा धामणगाव कडून अहमदनगर दिशेने जात होता. रात्री साडे अकरा वाजेदरम्यान व्यंको कंपनीकडे डाव्या बाजूने वळण घेत असताना ट्रकला पाठीमागून आलेल्या रुगणवाहिकेने क्र. एम एच १६ क्यू ९५०७ जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात रुग्णवाहिका चालक भरत सिताराम लोखंडे, वय ३५, रा. धामणगाव ता. आष्टी, मनोज पांगु तिरखुंडे, पप्पु पांगु तिरखुंडे, दोन्ही रा. जाट देवळा, ता. पाथर्डी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर डॉ. राजेश बाबासाहेब झिंजुर्के, वय ३५, रा. सांगवी पाटण, ता. आष्टी यांचा मॅक केअर हॉस्पीटल, अहमदनगर येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. त्याच बरोबर ज्ञानदेव सूर्यभान घुमरे, वय ४५, रा. घाटा पिंपरी, ता. आष्टी हे गंभीर जखमी झाले असुन त्यांच्यावर मॅक केअर हॉस्पीटल अहमदनगर येथे उपचार चालु आहेत. अपघाताची माहिती मिळताच सपोनि. ढाकणे, पो. उप.नि सातव, स पो नि .रोकडे, पोशि/केदार, शिरसाट, चालक पोशि/कांबळे यांनी घटनास्थळी पोहचून जखमींना अहमदनगर येथे दवाखान्यात रवाना केले. तर दुसऱ्या अपघातात मुंबई वरून बीडकडे जात असलेल्या सागर ट्रॅव्हल्स ताबा सुटल्याने सकाळी सहाच्या दरम्यान उलटल्याची घटना आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील आष्टा फाटा नजीक घडली आहे.यात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत असून अनेक जण जखमी झाले आहेत.मुंबई वरून बीडकडे निघालेली सागर ट्रॅव्हल ही बीड नगर राष्ट्रीय महामार्गावरील आष्टी तालुक्यातील आष्टा फाटा नजीक आज सकाळी सहाच्या दरम्यान उलटल्याने झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमी वर आष्टी,जामखेड येथे उपचार सुरू असल्याचे बोलले जात असून आष्टी पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

# नगर-बीड महामार्गावर दौलावडगाव रुग्णवाहिका व ट्रकचा अपघात..

## डॉक्टर,रुग्णवाहिका चालकासह एकूण ४ जणांचा दुर्दैवी मृत्य

**आष्टी ।प्रतिनिधी**

दि.२५ ऑक्टोबर रोजी रात्री २१.३० वा.च्या सुमारास पो.स्टे. अंभोरा हद्दीत मौजे दौलावडगाव शिवारात दत्त मंदिराजवळ ट्रक क्र. चक २१ द ८६०० हा धामणगाव कडून अहमदनगर दिशेने जाऊन व्यंको कंपनीकडे डाव्या बाजुने वळन घेत असतांना पाठीमागून आलेल्या मारुती ओमणी अम्बुलन्स क्र. MH 16 Q 9507 ने सदर ट्रकला मागुन जोराची धडक दिली. सदर गंभीर अपघातात अम्बुलन्स मधील १) भरत सिताराम लोखंडे, वय ३५, रा. धामणगाव ता. आष्टी (चालक), २) मनोज पांगु तिरपुडे, ३) पप्पु पांगु तिरखुंडे, दोन्ही रा. जाट देवळा, ता. पाथर्डी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तसेच ४) डॉ. राजेश बाबासाहेब झिंजुर्के, वय ३५, रा. सांगवी पाटण, ता. आष्टी यांचा मॅक केअर हॉस्पीटल, अहमदनगर येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला आहे. तसेच ५) ज्ञानदेव सूर्यभान घुमरे, वय ४५, रा. घाटा पिंपरी, ता. आष्टी हे गंभीर जखमी असुन त्यांच्यावर मॅक केअर हॉस्पीटल अहमदनगर येथे उपचार चालु आहेत.सदर अपघाताची माहिती मिळताच आम्ही स्वतः सपोनि. ढाकणे,पोउपनि.सातव,सफौ./



रोकडे,पोशि/केदार,शिरसाट, चालक पोशि/कांबळे अशांनी घटनास्थळी पोहचून जखमी व मयत यांना अहमदनगर येथे दवाखान्यात पाठविले. तसेच अपघातग्रस्त दोन्ही वाहणे रस्त्यातून बाजुला केले असून वाहतुक सुरळीत चालु आहे. घटनास्थळी शांतता असुन पुढील योग्य ती कारवाई करीत आहोत.सपोनि.महादेव ढाकणे

# कितीही रावण एकत्र आले तरी मोदीच निवडून येणार; मोदींच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे अनेकांच्या पोटात दुखते-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**अहमदनगर ।प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे अनेकांच्या पोटात दुखते असा खोचक टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे. शिर्डी येथील शेतकरी मेळाव्यात बोलतांना शिंदे यांनी ही टीका केली आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदी व्यासपीठावर असतांना शिंदे यांनी ही टीका केली आहे. तर इंडिया आघाडीच्या रुपाने कितीही रावण पुढे आले तरी नरेंद्र मोदी निवडून येणारच असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असून, अहमदनगर जिल्ह्यातील अनेक विकासकामांचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. दरम्यान, त्यांच्या याच दौऱ्यावरून विरोधकांकडून टीका देखील करण्यात आली होती. तर, विरोधकांच्या याच टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यात कोणताही नागरिक हा उपचाराशिवाय राहू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. निळवंडेमुळे १८२ गावातील जमीन ही ओलीताखाली येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या विकास कामांना हात लावतात त्यांचे सोने करतात असे म्हणानाच मोदींच्या हाताला सोन्याचा परीस असल्याचे मतही यावेळी शिंदे यांनी व्यक्त केले आहे.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, इंडिया आघाडी सारखे किती रावण एकत्र आले तरी तुमच्या विरोधात उभे राहू शकत नाही, २०२४ मध्ये पूर्ण ताकदीने पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान पदी विराजमान होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. कितीही रावण एकत्र आले तरी पुन्हा मोदीच निवडून येणार आहेत. विकासकामे पाहूण अनेकांना पोटदुखी होत आहे. त्यांच्यासाठी आम्ही दावाखाना सुरू केला आहे, असे म्हणत इंडिया आघाडीवर टीकास्त्र डागले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीी लोकशाहीवर अपार श्रद्धा आहे असेही त्यांनी म्हटले आहे. तर मोदी पुन्हा येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले आहे असे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, देशातील १४० कोटी जनता ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आहे. जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था करण्यावर केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. निळवंडे प्रकल्पाचा इतिहास सर्वांना माहिती आहे, पण देवेंद्र फडणवीसांच्या काळात या प्रकल्पावर काम सुरू करण्यात आले. तर आता आम्ही या प्रकल्पाला चालना देऊ. मविआच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात काहीच कामे झाले नाही, असा टोलाही मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरे यांना लगावला आहे.

# पंढरीतील नवीन चंद्रभागा बस स्थानक उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**पंढरपूर ।प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील तब्बल १५ एकर जागेमध्ये २३ कोटी रुपये खर्चून राज्यातील सर्वात मोठे नवीन चंद्रभागा बस स्थानक उभारले आहे. मागील आषाढी यात्रे दरम्यान या बसस्थानकाचा तात्पुरता वापर करण्यात आला होता. मात्र नियमित वापरासाठी हे बस स्थानक अद्यापही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे.पंढरपूर हे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज सुमारे ५० हजार तर आषाढी कार्तिकी यात्रेच्या दरम्यान लाखो भाविकांचे पंढरीमध्ये आगमन होत असते. राज्यभरातील लाखो भाविक पंढरपूरमध्ये येजा करण्यासाठी एसटी महामंडळाच्या बस गाड्यांमधून मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात.या प्रवाशांच्या सुविधे करिता एसटी महामंडळाने पंढरपूर मध्ये नवीन चंद्रभागा बस स्थानक उभारले आहे. या प्रशस्त व अद्ययावत बसस्थानकामध्ये प्रवासासाठी अनेक सोईसुविधा उपलब्ध केल्या आहेत.१५ एकर जागेमध्ये सुमारे ७० हजार चौरस फुट क्षेत्रफळ असलेली बस स्थानकाची अद्ययावत इमारत बांधून तयार आहे. या इमारती मध्ये एकूण ३४ फलाट असून दररोज सुमारे ५ हजार बसेसची येजा करण्याची क्षमता आहे.राज्यातील सर्वात मोठे बस स्थानक असलेल्या या स्थानकामध्ये प्रवासी व एस टी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय



उपलब्ध करण्यात आली आहे. या इमारतीची रंगरंगोटीसह अंतर्गत सजावट व इलेक्ट्रिकची कामे देखील पूर्ण करण्यात आली आहेत. फलाट परिसरामध्ये लाईट व पंखे देखील बसविण्यात आले आहेत.बस स्थानक बाह्यपरिसरात प्रकाश व्यवस्थेसाठी जागोजागी हाय मास्ट लॅम्प देखील उभारले आहेत. एकंदरीतच हे नवीन चंद्रभागा बस स्थानक सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असून आता उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे.मागील आषाढी यात्रेच्या वेळी या बस स्थानकाचा तात्पुरता वापर करण्यात आला होता. येत्या कार्तिकी यात्रेच्या दरम्यान देखील या बस स्थानकाचा प्रशासन वापर करणार आहे. मात्र नियमित वापरासाठी हे बस स्थानक अद्यापही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे.सध्या एस टी महामंडळ प्रशासन शहर पोलीस स्टेशन लगतच्या बस स्थानकाचा वापर करीत आहे. या बस स्थानकांमध्ये प्रवाशांसाठी कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे अद्ययावत सोयीसुविधांनी सज्ज असलेल्या नवीन चंद्रभागा बस स्थानकाचे उद्घाटन केव्हा होणार असा सवाल लाखो प्रवाशांमधून विचारला जात आहे.

# मंगळवेढयात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी साखळी उपोषण




**मंगळवेढा ।प्रतिनिधी**

सकल मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षण मिळावे यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या अंतरवाली सराटी ता अंबड जि जालना येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ मंगळवेढा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने दामाजी चौकात सुरू असलेला साखळी उपोषणाचा लढा अधिक तीव्र करण्यात आला.याअगोदर सरकारला ४० दिवसाची मुदत दिलेली असताना देखील शासनाने दिलेला शब्द पाळला नाही. यासाठी पुन्हा एकदा शांततेच्या मार्गानेच लढ्यासाठी मराठा समाजाने कंबर कसली आहे कालपासून मंगळवेढा शहरात नियोजित केलेल्या रूपरेषेनुसार साखळी उपोषणात सकाळी १० ते २ व दुपारी २ ते सायं ६ या वेळेत मंगळवेढा शहरातील प्रत्येक गल्लीतील मराठा बांधव आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी आंदोलनात सहभाग नोंदविणार आहेत तसेच ग्रामीण भागातही पक्ष गेला चुलीत व नेतेही गेले चुलीत,आरक्षण नाही तर कोणत्याही राजकीय नेत्याला गावात प्रवेश नाही.अशा प्रकारचे बॅनर लावून उपोषणास जोरदार पाठिंबा मिळत आहे. तसेच शासनाच्या आरक्षण देण्याच्या उदासिनतेबाबत निषेध व्यक्त करण्यासाठी शहरात व गावागावांत कॅन्डल मोर्चा देखील काढण्यात येणार आहेत तरी हक्काचे आरक्षण मिळविण्यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून साखळी उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा समाज मंगळवेढा तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.दरम्यान माचणूर व रहाटेवाडी या ग्रामपंचायतीने मराठा आरक्षणासाठी ठराव करण्यात आले.

# ज्येष्ठ किर्तनकार बाबा महाराज सातारकर यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून श्रध्दांजली



**मुंबई**-ज्येष्ठ किर्तनकार हभप बाबा महाराज सातारकर यांनी महाराष्ट्राची विठ्ठल, ज्ञानेश्वर भक्तीची परंपरा, वारकरी सांप्रदायाचा वारसा समर्थपणे पुढे नेला. साध्या, सोप्या, रसाळ, ओघवत्या वाणीतल्या किर्तनांनी महाराष्ट्राचं प्रबोधन केलं. प्रबोधनाच्या चळवळीतून अज्ञान, अनीती, अंधश्रद्धेसारख्या कुप्रथांविरुद्ध लढा दिला. त्यांच्या किर्तनांनी व्यसनमुक्तीच्या लढ्याला बळ दिलं. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक क्षेत्रात बाबा महाराजांचं स्वतंत्र स्थान होतं. त्यांचं निधन ही महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, प्रबोधनाच्या चळवळीची मोठी हानी आहे. बाबा महाराजांच्या कुटुंबियांच्या, अनुयायांच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार ज्येष्ठ कीर्तनकार बाबा महाराज सातारकर यांना श्रध्दांजली वाहिली आहे.

# राष्ट्रवादीच्या सोशल मीडियाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्या बद्दल महेश नागरी पतसंस्थेच्या वतीने मारूती पवार यांचा सत्कार

**अहमदनगर ।प्रतिनिधी**

भिंगार येथील महेश नागरी पतसंस्थेच्या वतीने दहा वर्ष संचालक राहिलेले मारूती पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चेंगेडे, व्हाईस चेअरमन शांतीलाल मुनोत, डॉ. श्रीकांत गांधी, रतीलाल गुगळे, संजय सपकाळ, बिपिनचंद्र लुनिया, रवींद्र बाकलीवाल, व्यवस्थापक राजेंद्र मेहेर आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. अशोक चेंगेडे म्हणाले की, भिंगारच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत मारूती पवार



यांचे योगदान लाभत आहे. यांची झालेली निवड भिंगारकरांच्या व संस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. त्यांचे सहकार क्षेत्रात देखील उल्लेखनीय कार्य राहिले असून, त्यांनी पतसंस्थेत दहा वर्ष संचालक तर पाच वर्षे व्हाईस चेअरमन पदाची धूरा सांभाळली. सर्वसामान्यांना जोडलेला कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख असून, राजकारणाबरोबरच त्यांचे सामाजिक योगदान व त्यांचा जनसंपर्क कौतुकास्पद आहे. त्यांच्या सोशल मीडिया विभागाच्या कार्यातून मोठ्या संख्येने युवा वर्ग राष्ट्रवादीशी जोडला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.सत्काराला उत्तर देताना मारुती पवार म्हणाले की, भिंगारकरांचे प्रेम व पाठीवरती थाप असल्याने सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळत आहे. प्रत्येक कार्यात हितचिंतकांनी दिलेल्या शुभेच्छाने भविष्यात आनखी चांगले कार्य करता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .